फौजदारी प्रक्रिया संहिता (१९७४ चे अधिनियम २) चे प्रकरण २१ अन्वये संक्षिप्त संपरिक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख

इचलकरंजी येथील २ रे न्यायदंडाधिकारी वर्ग–१, डी. बी. साठे यांचे न्यायालयात

MHKO050032802026

**समरी फौजदारी केस नं.१८१६/२०२६**

निशाणी क्र.१

| | |
|---|---|
| १) गुन्हा घडल्याची तारीख | दि. ३०/०६/२०२६ |
| २) फिर्याद दाखल केल्याची तारीख | दि. ०१/०७/२०२६ |
| ३) फिर्यादी यांचे नाव, वय, पत्ता इत्यादीचा तपशील | ए.एन. सिराजभाई, पो.हे.कॉ.निर्भया पथक, इचलकरंजी. |
| ४) आरोपी यांचे नाव, वय, पत्ता इत्यादीचा तपशील. | गणेश आनंदा करडे, व.व.२४<br>रा.सिध्दार्थ कॉलनी, गल्ली नं.६,<br>चंदूर, ता. हातकणंगले. |

५) दोषारोपपत्रातील गुन्हयाचा तपशील जो आरोपीस वाचून स्पष्ट करुन सांगण्यात आला तो याप्रमाणे.

दि. ३०/०६/२०२६ रोजी १३.०० वाजता  कन्या कॉलेज, इचलकरंजी येथे रोडवर तुम्ही आरोपीने सार्वजनिक ठिकाणी मोठमोठयाने आरडाओरडा करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असताना मिळून आला तुम्ही महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११०/११७ प्रमाणे अपराध केलेला आहे. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या दखलगिरीत घडला आहे.

६) आरोपीचे प्रतिकथन

प्रश्न १– पोलिसांनी केलेल्या तपासकामातील कागदपत्राच्या प्रती मिळाल्या काय ?

उत्तरः– होय

प्रश्न २– दोषारोपपत्रातील गुन्हयाचा तपशील जो आता तुम्हांस वाचुन व स्पष्ट करुन सांगण्यात आला तो तुम्हांस समजला का ?

उत्तरः– होय

प्रश्न ३– सदरचा गुन्हा तुम्हांस कबुल आहे का ?

उत्तरः– होय

समक्ष

Digitally signed by DATTATRAY BHAGWAN SATHE
Date: 2026.07.02 15:39:17 +0530

———————
**आरोपीची सही**
**दि.०२/०७/२०२६**

**डी. बी. साठे**
**न्यायदंडाधिकारी वर्ग–१, न्यायालय क्र.२**
**इचलकरंजी**

<u>न्यायनिर्णय</u>

(जाहीर दिनांक ०२/०७/२०२६)

१. आरोपीला न्यायालयासमोर हजर केले असता त्याने सदरचा गुन्हा कबुल असल्याचे सांगितले. तसेच गुन्हा कबुल करताना त्याच्याविरुध्द कुठल्याही प्रकारचा दबाव किंवा प्रलोभन नसल्याचेही सांगितले.म्हणुन आरोपीला त्याच्या विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपाचा सारांश वाचून समजावून सांगितला असता त्याने गुन्हा कबुल आहे असे पुन्हा सांगितले. त्यामुळे आरोपीची कबुली स्वखुशीने आहे असे दिसुन येते.

२. आरोपीला शिक्षेबाबत विचारले असता त्याच्या घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीबीची असून कमी दंड करण्याची विनंती केली. आरोपीची आर्थिक परिस्थिती व त्याच्यावर असलेली जबाबदारी या दोन्ही गोष्टी लक्षात घेता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

<u>आदेश</u>

१. आरोपीस महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११०/११७ खालील गुन्हयासाठी दोषी धरण्यात येते.
२. आरोपीने महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११०/११७ खालील गुन्हयासाठी दंड म्हणुन रक्कम रुपये ५००/– (रुपये पाचशे मात्र) भरावेत. दंडाची रक्कम न भरल्यास आरोपीला दहा दिवस साध्या कारावासाची शिक्षा देण्यात येते.
३. आरोपीला निकालाची प्रत निःशुल्क देण्यात यावी.

येणेप्रमाणे खुल्या न्यायालयात जाहीर.

Digitally signed by DATTATRAY BHAGWAN SATHE
Date: 2026.07.02 15:39:21 +0530

**(डी. बी. साठे)**
**न्यायदंडाधिकरी वर्ग–१,न्यायालय क्रं.२,**
**इचलकरंजी, जि.कोल्हापूर**

**दिनांक –०२/०७/२०२६**